REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 7 | APRIL - 2019

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मक्रांतीची फलश्रुती



प्रा. प्रमोद एस.मेश्राम
सहयोगी प्राध्यापक , श्री.मनोहर हरी खापणे महाविद्यालय पाचल.
डॉ.यु.सी.राठोड
[2]सहयोगी प्राध्यापक , नुतन महाविद्यालय सेलू.

## प्रस्तावना

प्राचीन काळापासून ते आजपर्यंत भारतीय समाजाची संरचना एका श्रेणीबद्ध व्यवस्थेत केली आहे. त्यामुळे समाजात ब्राम्हण,क्षत्रिय,वैश्य, शुद्र अशी उतरंडीची स्थिती दिसून येते. हिंदू धर्मात अस्तित्वात असलेल्या जातीत स्वत:ला श्रेष्ठ मानन्याची परंपरा आहे. चार वेद, सहा उपनिषदे, अठरा पुराणे,तेवढीच उपपुराणे व दोन महाकाव्ये यामध्ये हिंदुंचे तत्त्वज्ञान सांगितले आहे.एवढेच नाही तर ती धर्मग्रंथे इश्वरनिष्ठ व इश्वरनिर्मित असल्यामुळे कोणीही त्यांच्या अधिसत्तेला आव्हान देऊ शकत नाही, असे हिंदूंचे तत्त्वज्ञान मानते. हिंदू धर्मातील श्रेणीविरूद्ध समाजरचनेत प्रत्येकाची कर्तव्ये ठरवून दिली आहेत. त्या कर्तव्यानुसार अर्थाजन करण्याची प्रत्येक जातीला मुभा आहे. परंतु या व्यवस्थेतील सर्वात खालच्या शुद्रातील महारांना निश्चीत असा व्यवसाय किंवा अर्थाजन करण्याची साधने उपलब्ध नाहीत. त्यामुळे शुद्रातील पुर्वाश्रमींच्या महारांचे या व्यवस्थेमुळे परिवर्तन होऊ शकले नाही. बौद्ध धम्माच्या दीक्षेपर्यंत पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांतील महारांची स्थिती दयनीय होती. मात्र बौद्ध धम्माच्या स्वीकारानंतर हळूहळू बौद्धांच्या जीवनात परिवर्तन व्हायला सुरूवात झाली.

## महाराष्ट्राचा महार :-

पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांतील महार ही जात अतिपुरातन असून ते प्राचीन नागवंशाचे आहेत. नागवंश हा एक प्राचिन वंश आहे. महाराष्ट्र ही नागांची भूमी म्हणून ओळखली जात असे. दक्षिण भारतात ही नागांची अनेक लहानमोठी राज्ये अस्तित्वात होती. प्राचिन काळातील नाग लोकांचे वंशज आजचे महार (बौध्द) आहेत. 'नाग लोक म्हणजेच आजचे महार लोक होत'.[1] ते आपल्या नावापूढे नाग ही उपाधी लावत असत. नाक हा 'नाग' या शब्दाचा अपभ्रंस आहे.

उदा.यशनाक महार, रामनाक, अंबरनाक, सिदनाक, अमृतनाक इत्यादी महार लोक नागवंशीय असून ती स्वत:ला सोमवंशीय म्हणत असत. तेच या भूमीचे मूळ रहिवाशी आणि राज्यकर्ते होते आणि म्हणूनच महारांवरूनच महाराष्ट्र हे नाव रूढ झाले.

महाराष्ट्राच्या उत्पत्तीबाबत एच.एल.कोसारे म्हणतात,'महाराष्ट्र हे नाव ज्या भूप्रदेशाला लावण्यात येते त्या भूभागात नागवंशाच्या महार गणाच्या लोकांनी प्राचीन काळात मोठ्या संख्येने येऊन निरनिराळ्या भागात वसाहती स्थापन केल्या होत्या. इतरही गणांचे लोक या प्रदेशात होते. परंतु त्या सर्वांमध्ये महार नागांचा गण प्रमुख होता. महार गण हा अनेक कुलांचा बनलेला होता. महार गणांच्या लोकांनी जो भूभाग व्यापलेला होता आणि ज्या भूभागाचे स्वामीत्व त्यांच्याकडे होते. त्या प्रदेशाला 'महाराष्ट्र' अशी संज्ञा प्राप्त झाली'[2]

डॉ.दत्तात्रय खानापूरकर यांच्या मते, 'महार हे महाराष्ट्राचे मूळ रहिवासी असून ते एकेकाळी महाराष्ट्राचे राज्यकर्ते होते.[3] एके काळचे राज्यकर्ते व मूळ रहिवाशी असलेल्या महारांना राजकीय पराभावातून अस्पृश्य बनविण्यात आले. अस्पृश्य झाल्यानंतर

गावकुसाबाहेर राहणाऱ्या या समाजाने स्वत:ची वेगळी संस्कृती निर्माण केली. त्यामध्ये महार, मांग व चांभार यांचा समावेश होता. त्यांची संस्कृती स्पृश्य समाजापेक्षा वेगळी होती.

## पूर्वाश्रमीच्या महारांची समाजातील स्थिती.

हिंदू व्यवस्थेने ठरवून दिलेल्या नियमानुसार अस्पृश्यांतील महारांच्या जिवनाचा चरितार्थ सुरू होता. त्यांनी काय काम करावे व काय करू नये यासाठी नियमांची मोठी मालिका तयार करण्यात आली होती. थोड्याफार फरकाने नियमांचा काटेकोर अंमलबजावणी संपूर्ण भारतात होती. हिंदू व्यवस्थेने अस्पृश्य असल्याचे ठरवून दिल्यामुळे त्या विरोधात कोणालाही जाता येत नव्हते. अशा अस्पृश्यांचे जेवण, पाणवठे, कपडे, गरजेच्या वस्तू सर्व काही स्पृश्यांपेक्षा वेगळे होते. शिक्षा ही व्यक्तीने केलेल्या गुन्ह्याच्या स्वरूपावर अवलंबून नव्हती तर गुन्हेगाराच्या जातीवर अवलंबून होती.

अस्पृश्यांच्या स्पर्शाने व सावलीने विटाळ होतो अशी भावना समाजात अस्तित्त्वात होती. त्यामूळे देवांच्या मंदिरात प्रवेश नव्हता. शिक्षणाचा अधिकार नष्ट करण्यात आला होता. 'महार वतन' कायद्यानुसार तो महत्त्वाचा बलुतेदार होता. तरिही त्याला गावची व सरकारची इतर कामे करावी लागत असत. सरकारी कामांच्या मोबदल्यात महारांना सरकारकडून 'हाडकी हडोळा' जमिन मिळत असे. ही जमीन सारामुक्त होती. रयतेच्या कामाच्या मोबदल्यात महारांना रोख पैसा मिळत नव्हता, यासाठी त्यांना काही हक्क व मानपान मिळत असत. शिवपूर्वकाळापर्यंत महारांना बावन्न प्रकारचे हक्क प्राप्त झाले होते. 'बावन्न हक्काच्या दोन (महमदशहा, निजामशहा) सनदा मिळाल्यामुळेच महार लोक 'उच्चवर्णीयांच्या सामाजिक व आर्थिक गुलामगिरीत अडकले होते. त्यामुळे बावन्न हक्कांची सनद ही महारांच्या सामाजिक व आर्थिक गुलामगिरीची आणि लाचारीची सनद ठरली.[4]

खेडेगावच्या इतर वतनदारांप्रमाणे महार हा सुद्धा गावचा वतनदार होता. महार हा गावचा वतनदार असूनही तो गावचा हरकाम्या नोकर होता. त्याच्या कामाचे उत्पन्न मात्र रोख स्वरूपात न देता बलुते व शिळ्या अन्नाच्या स्वरूपात दिले जात होते. त्यामुळे मिळणाऱ्या बलुत्यामध्ये उपजीविका करणे पूर्वाश्रमीच्या महारांना कठीण जात होते. समाजातील अन्यायग्रस्त वागणूक मिळत असल्यामुळे बौद्ध धम्मदीक्षेपर्यंत त्यांचे समाजातील स्थान नगण्य होतो.

## डॉ.बाबाासाहेब आंबेडकरांची बौद्धधम्मदीक्षा :

डॉ.भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म पूर्वाश्रमीचा महार कुटुंबात झाल्यामुळे त्यांच्या दु:खाची जाणीव त्यांना होती. सर्वच बाबतीत समाजाकडून अन्याय, अपमान आम्हालाच का मिळतो? यासारखे अनेक प्रश्न त्यांच्या मनात निर्माण होत असत. उच्च विद्याविभूषित असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील अनेक प्रश्नांबाबत वाचा फोडायला सुरूवात केली. अस्पृश्यांना जिवन जगण्यासाठी आवश्यक असलेले पाणी मिळत नव्हते. त्यामुळे समाजात जागृती निर्माण व्हावी यासाठी महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह हे सत्याग्रह त्यांनी स्वत: घडवून आणले. त्यांच्या प्रयत्नामुळे अमरावती अंबादेवी मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह, पुणे येथील पर्वती मंदिर सत्याग्रह, मुखेडचा सत्याग्रह, घडवून आणले. तरिही स्पृश्यांच्या मनावर याचा फारसा परिणाम झाला नाही.

13 ऑक्टोबर 1935 साली येवला परिषदेत 'दुर्देवाने अस्पृश्य हिंदू असा डाग घेऊन मी जन्माला आलो, पण ती गोष्ट माझ्या स्वाधीन नव्हती. तथापी हा नीच दर्जा झुगारून देऊन ही स्थिती सुधारणे मला शक्य आहे आणि ते मी करणारच याबद्दल मुळीच संशय नको. मी तुम्हाला स्पष्टपणे सांगतो की, हिंदू म्हणवून घेत मी मरणार नाही.'[5] 21 वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर सामुहिकपणे नागपूर ठिकाणी 14 ऑक्टोबर 1956 साली आपल्या लाखो अनुयायांसोबत बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यालाच नवयान बौद्ध धम्म' समजले जाते.

15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले असले तरी ते फक्त समाजातील उच्चभ्रू समाजापूरते मर्यादित होते. त्यामुळे अस्पृश्यांना अशा स्वातंत्र्याचा उपभोग घेता आला नाही. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मक्रांतीने संपूर्ण बौद्धांना पूर्वाश्रमीच्या बंधनातुन मुक्त केले. त्यामुळेच बौद्धधम्माचा स्वीकार ही घटना अतिशय महत्वपूर्ण ठरते.

नागपूर व चंद्रपूर येथील सामुदायिक बौद्ध धम्मदीक्षेनंतर मुंबईला धम्मदीक्षेचा सोहळा घ्यावयाचा होता. मात्र केवळ 52 दिवसातच त्यांचे महापरिनिर्वाण झाले. तरिही भारतातील बौद्धधम्मदीक्षेची चळवळ संपली नाही. महाराष्ट्रातील व इतर भागातील अनेक बौद्ध अनुयायांनी बौद्ध धम्मदीक्षेचे सोहळे महाराष्ट्राबरोबरच देशातही अनेक ठिकाणी घडवून आणले. सर्वाधिक बौद्ध धम्म दिक्षेचे सोहळे महाराष्ट्रातच 1956 ते 1961 पर्यंत घडवून आणण्यात आले. यासंबंधी राम आहूजा म्हणतात, 'यह एक ऐसी घटना

है जिसका अनुपात भारत की जनगणना में परिलक्षित होता है जिसके अनुसार 1951 मे 1,81,000 बौद्ध, 1961 मे 32 लाख तथा 1981 मे 47 लाख बौद्ध आलेखों में है। अकेले महाराष्ट्र मे ही यह कहा जाता है कि 1956 में डॉ.बी.आर आंबेडकर के नेतृत्त्व मे 35 लाख हरिजन बौद्ध धर्म में परिवार्तित हुए।'[6]

## बौद्धांच्या जीवनातील समग्र परिवर्तन

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून अनेकांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यामुळे हिंदूची लोकसंख्या कमी झाली. धम्मदीक्षितांनी आजपर्यंतच्या काळात आपल्या सर्वांगिण स्थितीत परिवर्तन घडवून आणले. या धम्मक्रांतीने भारताताल अनेकांना पूर्वाश्रमीच्या बंधनातून मुक्त केले. बौद्ध धम्मक्रांतीमुळे बौद्धांच्या जीवनात नवीन उर्जा, बळ निर्माण झाले. बौद्ध धम्म स्वीकारल्यामुळे तळागाळातील वंचित माणूस जागा झाला. या चळवळीत बौद्ध स्त्रियांचाही सहभाग उल्लेखनिय असल्याचे दिसून येते. त्यांनी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अतुलनीय प्रगती केली.

बौद्ध धम्म दीक्षेनंतर खऱ्या अर्थाने शिक्षणामुळे क्रांती होते याची जाणीव बौद्धांना झाली. त्यामुळे उच्च शिक्षण घ्यायला त्यांनी सुरूवात केली. उच्च शिक्षणाची विविध ठिकाणे त्यांनी पादाक्रांत केली. उच्च नोकरी मिळाली. त्यामूळे जीवनाच्या आर्थिक स्थितीत अमूलाग्र परिवर्तन घडून आले. झोपडीत राहणारा समाज सिमेंट कॉंक्रेटच्या वसाहतीतून राहू लागला. पायी चालणारा समाज मोठमोठ्या स्वत:च्या गाड्यातून फिरू लागला. समाजात नावारूपाला आला.

बौद्धांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचे परिवर्तन म्हणजे ज्यांनी हजारो वर्षापासून स्वत:च्या घरामध्ये पूजल्या जाणाऱ्या देव-देवतांच्या मूर्ती, प्रतिमा एका झडक्यात विर्सजीत केल्या. जुन्या सर्व बुरसटलेल्या चालिरीती झुगारून दिल्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञांचे पालन बौद्ध करताना दिसून येतात. बौद्ध संस्कृतीचे प्राचीन स्वरूप आज समाजासमोर आल्यामुळे बौद्ध संस्कृतीचे स्वरूप कळू लागले. त्या-त्या घटनांचे प्रतिबींब आपापल्या घरांमध्ये बौद्धांनी निर्माण केलीत.

'शिका, संघटीत व्हा संघर्ष करा' हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मुळ तत्वज्ञान बौद्धांनी आत्मसात केले. मुलांच्या मनामध्ये जीद्, प्रेरणा व महत्त्वाकांक्षा निर्माण केली. शिक्षित झालेल्या बौद्धांचे प्रमाण इतरांपेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. शिक्षीत झालेल्यांनी केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या अधिकाराच्या जागा प्राप्त केल्या.

पूर्वाश्रमीचा महार बौद्ध झाल्यामूळे समाजातील तिरस्कारयुक्त, लाचारयुक्त जीवन संपले. धम्मदिक्षेच्या त्रेसष्ठ वर्षानंतर सर्वच क्षेत्रात परिवर्तन झाल्याचे दिसून येते. ग्रामीण भागातील बौद्ध समाज स्वाभिमानाचे जीवन जगत आपली प्रगती करीत आहे. अजुनही ग्रामीण भागातील कुटुंबे दारिद्र्याचे जीवन जगत आहेत. अशांसाठी शासनाने विकासाच्या दृष्टीने पर्यायी आर्थिक धोरण राबविण्याची गरज आहे.

## सारांश :

1956 च्या बौद्धधम्म क्रांतीने जगाच्या इतिहासातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात लाखो पूर्वाश्रमीच्या महारांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला. ही घटना महारांच्या जीवनातील परिवर्तनाची नांदी ठरली. बौद्धांच्या जीवनामध्ये नव्या संस्कृतीचे अंकूर दिसू लागले. हिंदू धर्मातील अनेक उपक्रम बंद झाले. बौद्धांनी आधुनिक मुल्यानुरूप जीवन जगायला सुरूवात केली. ही धम्मक्रांतीची फलश्रुती आजही अव्याहतपणे सुरू आहे.

## संदर्भ :

1) खैरमोडे चां.भ.'डॉ.भीमराव रामजी आंबेडकर, 'खंड पहिला, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ पुणे, चौथा आवृत्ती आक्टोबर 1992 पृ.62
2) कोसारे एच.एल. 'प्राचिन भारतातील नाग', ज्ञानप्रदिप प्रकाशन, नवी शुक्रवारी शिर्के रोड, नागपूर -2 1989 पृ.131
3) एन.एम. 'नवा महाराष्ट्र भाग-2', कुसुम नय्यर नॅशनल इन्फर्मेशन अॅन्ड पब्लिकेशन लि. अपोलो बंदर, मुंबई 1949 पृ.119
4) कठारे अनिल, 'शिवकाळ व पेशवाईतील महारांचा इतिहास', सुगावा प्रकाशन सदाशिव पेठ पुणे, तृतीय आवृत्ती मे 2009 पृ.23
5) मून वसंत, नरके हरी, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग -1', डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र-प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन मुंबई 15 ऑक्टोबर 2002 पृ.432

6) आहूजा राम, 'भारतीय समाज, रावत पब्लिकेशन जवाहरनगर जयपूर 2003 पृ.80

LBP PUBLICATION